Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- X OCTOBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# आर्यसमाजाचे राष्ट्र बांधणीतील योगदान व देणं

प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

भारताच्या विकास व प्रगतीत अनेक समाज व विभुतींची भुमिका महत्वपुर्ण आहे. या प्रत्येक समाजाने भारताच्या प्रगतीत आपापल्यापरीने महत्वाचे यगान दिले. प्राचीन काळातील महत्मा गौतमबुध्द, मध्ययुगातील महात्मा बसवेश्वर, आधुनिक युगातील ब्राहमो, समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, चा सर्वांनी या देशाला सक्षम व लोकशाही प्रधान बनवण्यात महत्वाचे कार्य केले. त्यामुळेच भारताला अस्पृश्यता, जातीयता, वर्णव्यवस्थेच्या जन्माधारित सिध्दांताला संपवण्याचा प्रयत्न केला. भारताच्या सामाजिक व राजकीय इतिहासाला व वर्तमानाला गौरवशाली करण्यात या प्रमुख समाजाची भुमिका आहे.

प्रस्तुत लेखात आर्य समाजाची राष्ट्र बांधणीतील भुमिका जाणून घेण्याच्या प्रयत्नासोबतच त्याने या देशाला कोणती वैचारिक शिदोरी दिली ते समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या विषयाची मांडणी प्रभावीपणे करण्यासाठी ऐतिहासिक व ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा आधार घेवून विश्लेषण करण्यात आला. आर्य समाज या देशाच्या वैभवशाली संस्कृतीला प्रर्तस्थापित करणारी एक चळवळ आहे हे गृहितक माणून ही मांडणी पुर्ण करण्यात आली. राष्ट्र बांधणतील आर्य समाजाची भुमिका समजावून घेण्याच्या दृष्टिने हा लेख महत्वपुर्ण आहे.

आर्य समाज प्राचीन वैदिक धर्म, संस्कृती आणि मुल्यांची पुर्नस्थापना करण्याची प्रेरणा देणारा एक सर्मपित व वैचारिक कार्यक्रम आणि चळवळ आहे. आर्यसमाजाचे नियम एक परिपुर्ण व समन्वयवादी विचारधारेस स्पष्ट करतात. आर्यसमाज कर्मकांडावर आधारित नाही. एका विशिष्ट जीवन पध्दतीच्या स्वरुपात व्यष्टी आणि समष्टीच्या सर्वांगीण प्रगती, राष्ट्रीयत्व आणि वेदाचे सर्व श्रेष्ठत्वासोबतच ईश्वराच्या सर्वशक्तमान आणि न्यायीक स्वरुपावर भर देते. यावरुन असे जाणवते की, नव भारताच्या स्वातंत्र्य आंदोलन व पुर्ननिमाणात आर्यसमाजाने महत्वपुर्ण भुमिका बजावली. राष्ट्रीय जीवनाच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात आर्यसमाजाने महत्वपुर्ण योगदान केले.

1875 साली महर्षि दयानंद सरस्वतीने वैचारिक क्रांतीसाठी आर्य समाजाची स्थापना केली. यांच्यामते राष्ट्र धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, सामाजिक या सर्व क्षेत्रात अध:पतानाच्या दिशेने जात आहे. सर्वत्र अज्ञान आणि अंधश्रध्देने अंधकार पसरवला अशा निराशामय वातावरणात स्वामी दयानंद सरस्वतीचे या भुतलावर आगमन होणे निश्चितच फलदायी आहे. त्यांना वयाच्या 14 व्या वर्षीच

आत्मज्ञान झाले. ते जगासमोर एक वेगळी ओळख बनवून प्रकट झाले. त्यांच्या व्यक्तिमत्वातून ब्रळमचार्य, विव्दतापुर्ण पंडित्य, अखंड भारतची भावना, मर्यादा पुरुष, करुणा, त्याग, तुप, अहिंस, या सर्वांचा समावेश आहे. त्यांचा विचारांची देण व परिपुर्ण सार म्हणजे आर्य समाज होय. आर्य समाजाने या देशाला, जगताला व मनुष्य जातीला काय देणगी दिली हे जाणून घेण्याचा या लेखाचा उद्देश आहे. त्यामुळे प्रथमत: जाणून घेवूया.

आर्य समाजाने या जगताला प्रत्येक क्षेत्रात विशाल दृष्टिकोन व एक निश्चित विचाराधारा दिली. यात प्रथमत: त्यांनी वेदाबाबत केलेल्या चिंतनातून मिळालेला सार समजावून घेवूया आर्य समाजाच्या मते वेद मानव जातीचे सर्वात प्राचीन, पवित्र आणि महत्वपुर्ण ग्रंथ आहेत. या वेदात सर्व सत्य विद्या आणि ज्ञान-विज्ञानाचे भंडार आहे. आर्य समाज वेदांकडे चला हा नारा देतो. या विश्वाच्या प्रारंभी ईश्वराने मानव कल्याण प्रगतीसाठी वेदाचे ज्ञान दिले. त्यामुळे वेद ईश्वरीय देणगी आहे. त्यामुळे वेद सर्वांसाठी व सर्वांचे आहेत. त्यामुळे सर्व स्त्री व शुद्राना वेदाचे वाचन करण्याचा अधिकारी आहे. वेद मानवतेच्या कल्याणाचे चिंतन करतात. वेद मनुष्य बनुन सुख व शांतीपुर्वक जगताची यात्रा पुर्ण करण्याचा स्वत: व दुसऱ्यालाही जगु देण्याचा संदेश देतात आर्य समाजाने वेदाचा पुर्नउध्दार केला. वेदाबाबतच्या चुकीच्या धारणांना तर्काच्या आधाराने व युक्तीने निरुउत्तर केले. वेदाचे वास्तववादी व खरे स्वरुप जगाच्या समोर ठेवण्यात आर्य समाजाची भुमिका महत्वपुर्ण राहिली.

आर्य समाजाने धर्माच्या क्षेत्रातील अंधश्रध्दा, ढोंगी व पाखंडीपणा आणि परंपरावादाला समाप्त करुन धर्माचे खरे स्वरुप लोकांसमोर आणले. धर्माला व्यावहारिक व वैज्ञानिक रुप दिले धर्म धारण करण्याची प्रक्रिया आहे. धर्माचा सबंध आत्म्याशी आहे. कार्य समाज मूर्तिपुजा, अवतारवाद, जादू-टोना, यात विश्वास ठेवत नाही. धर्म फक्त मंदिर, पुजारी इ. पर्यंतच मर्यादित नाही. तो मानवाच्यातर्वनाशी संबंधित आहे. सर्वांनी आपले सर्व कार्य धर्मानुसार सत्य आणि असत्याचा विचार करुन करावेत. धर्माच्या नावावर होणाऱ्या सर्व अधर्मांना विरोध केला. धर्माची भिंती दाखवून भोळया भाबडया लोकांना जे लुटले जाते त्यास विरोध केला, धर्माला ओळखून संप्रदायांना नष्ट करा असे आर्य समाज सांगतो. कारण संप्रदाय आपापसात संघर्ष घडवून आणतो. तर धर्म एकत्रित शांततेने व प्रेमाने जगण्याचा संदेश देतो.

आर्य समाजाची स्थापना होण्यापुर्वी या देशातील जनता विविध पाम कर्मात आणि ढोंगी आचार विचाराने जगत होते. स्त्रीयांची स्थिती अत्यंत दयनीय होती. स्त्रियांची तुलना नरकासोबत केल जात जनता अस्पृश्यता अंधश्रध्देत गुंतलेली होती. जन्मावर आधारित वर्णव्यवस्थेऐवजी कर्मावर आधारित वर्णव्यवस्थेवर भर दिला. सर्व मानव समान आहेत. मेहनत आणि प्रामाणिक पणाच्या आधारावर मनुष्य काहीही बनु शकतो. सर्वांना प्रगतीचा समान अधिकार आहे. समाजातील सर्व वाईट प्रथांना विरोध करुन आर्य समाजाने समाजाला एक नीव दिशा दिली. वैदिक धर्माची दिक्षा देण्याची चळवळ चालवली आर्य समाजाने

बालविवाह व सतीप्रथेला विरोध केला. लोकामध्ये तर्क व बुध्दीच्या साहयाने जागृती केली. त्यामुळेच या सर्व वाईट प्रथांचे प्रस्त कमी झाले. आर्य समाजाने बुवाबाजी व महेतामार्फत पसरवल्या जाणाऱ्या अंधश्रध्देची निंदा केली.

आर्य समाजाने स्त्रियांना यज्ञोपवीत धारण करणे, वेद वाचणे, यज्ञ करणे आणि सामाजिक जीवनात पुरुष वर्गासमान सर्व अधिकार दिले. स्त्री ही एक भोगाची वस्तु आहे. या स्त्री प्रतीच्या विचारास अमान्य करुन त्यांना मातृशक्तीचा सन्मान देण्यात आर्य समाजाचे योगदान श्रेष्ठ आहे. स्त्रीयांसोबतच्या पशुतुल्य व आमानवी व्यवहाराचा विरोध केला. ज्या ठिकाणी स्त्रीची पजा व अर्चना होते. तेथेच देवाचा निवास असतो. या स्त्रीप्रतीच्या विचारास समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचवले स्त्रिचा सन्मान हाच शांतता व प्रगतीचा मार्ग आहे. स्त्री नरकाचे प्रवेशव्दार आहे. ती अन्याय व शोषणास पात्र आहे. अशा अव्यवहार्य व अमानवीय समाजास नष्ट केले. स्त्री हाच स्वर्गाच्या दिशेने जाणारा प्रमुख आधार व माग्र आहे. स्त्रीयांच्या शिक्षणाचा मार्ग आर्य समाजाने प्रशस्त केला.

आर्य समाजाच्या विचारसरणीत राष्ट्रीय चैतन्य, देशाप्रती कर्तव्याची भावना ओत-प्रोत भरली स्वातंत्र्य चळवळीतील या समाजाची भुमिका प्रशांसनीय आहे. आर्य समाजाच्या राष्ट्रीय भावेनेने प्रेरीत होवून लोक स्वातंत्र्य आंदोलनात सहाभागी होवून अमर झाले. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेले अनेक लोक आर्य समाी होते. स्वातंत्र्य आंदोलनात दयानंद सरस्वतीची भुमिका महत्वपुर्ण होती. ते स्वदेशी शासनाचे कट्टर समर्थक होते. आर्य समाजाच्या विचारसरणीत स्वदेश, स्वसंस्कृती स्वसभ्यता आणि स्वभाषेवर अधिक भर दिला. ज्या देशात आपला जन्म झाला त्याप्रती आपण नेहमी कृतज्ञ असावे. आर्य समाजाने देशाची एकता, अखंडत्व, सभ्यता, संस्कृती ईत्यादीच्या सुरक्षेसाठी नेहमीच संरक्षकांची भुमिका बजावली. वरीलप्रमाणे अनेक क्षेत्राच्या सुधारणेसाठी आर्य समाजाने देणगी दिली या लेखाच्या पुढचा भाग म्हणजे आर्य समाजाचे राष्ट्र निर्मितीतील योगदान याविषयी विचार करु या.

आर्य समाजाने राष्ट्र बांधणी करताना विविध क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान दिले. ते पुढीलप्रमाणे आहे. आर्य समाजाच्या स्थापनेचा मुख्य हेतू धार्मिक होता. राजकीय नाही. परंतु आर्यसमाजाच्या व्यापक व उदारमतवादी दृष्टिकोनामुळेच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आर्य समाजाने मुख्य भुमिका बजावली. स्वदेशी, स्वाभाषा व स्वराज्याची सर्वप्रथम घोषणा आर्य समाजाने केली. स्त्री प्रगती, हजिन उध्दार, राष्ट्रीय एकात्मता, गोरक्षण, दारुबंदी इत्यादी विषयाबाबत महत्वपुर्ण भुमिका व अभियान चालवले स्वामी श्रध्दानंद, लाल लजपतराय, महात्मा हंसराज, हरदयाळ पंडित गुरुदत्त, चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल ई. स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्व आर्य समाजाची देणगी आहे. स्वामी दयानंद सरस्वती हे खरे व उत्तम राजकीय नेते होते. दुसऱ्यांचे चांगले शासन आपल्या वाईट शासनापेक्षाही वाईट असते असे दयानंद सरस्वतीचे मत होते. राज्याचे संचलन करण्यासाठी राज्यसभा, विधानसभा, आणि धर्मसभा या तीन सभांची आवश्यकता असल्याचे महर्षि दयानंतर सरस्वती म्हणतात. या तीन सभा

सर्वच विषयावर एकत्रित मिळून उत्तम व्यवहाराचे निर्धारण करतील या तीन सभापैकी राज्यसभेची स्थिती सर्वोच्च असून शासनाचे संचलन त्यामार्फतच होते. राजाची निवड परंपरा किंवा वंशपध्दतीनुसार न होता. जनतेमार्फतच होते. राजाची निवड पंरपरा किवा वंशपध्दतीनुसार न होता जनतेमार्फत व्हावी. यासह महर्षिनी राजाचे गुण, कर्तव्य आणि राज्य संस्थेच्या कार्यक्षेत्राबाबतही विचार मांडले आर्य समाजाने देशाच्या राजकीय जीवनात वारंवार महत्वपुर्ण भुमिका बजावली. राष्ट्रीय एकात्मता व अखंडत्वाबाबत आर्यसमाजाचा दृष्टीकोन प्रारंभापासूनच अधिक स्पष्ट व सुदृढ आहे. देशाच्या विभाजनाचे आर्य समाजाने विरोध केला परकीय आक्रमण आणि अंतर्गत संकटाच्या समस्यांचे समाधानासाठी आर्यसमाज सदैव तत्पर होता. विस्थापितांच्या पुनर्वसनात आर्य समाजाने तन-मन-धनाने प्रयत्न केले.

स्वातंत्र्यपुर्व काळातील भारताच्या सामाजिक नवनिर्मितीत आर्य समाजाचे अमुल्य आधारित व्यवस्थेचे समर्थन केले. अस्पृश्यतेला नष्ट करण्यासाठी तिच्या हिंदू व्यवस्थेच्या आधाराला नष्ट केले. हरिजनोध्दार कार्यक्रमाचा प्रारंभ केला. सत्यार्थप्रकाश या प्रबोधनकारी ग्रंथाची निर्मिती करुन स्वामी दयानंदानी भारतीय समाजात महान समाज सुधारकाचे दायित्व निभावले. स्त्रीयांना त्यांचा सन्मान मिळवून देण्यात महत्वपुर्ण कार्य केले. राष्ट्र भाषा हिंदी भाषे प्रती आर्य समाजाचे महत्वपुर्ण योगदान आहे. हिंदी ही भाषे प्रती आर्यसमाजाचे महत्वपुर्ण योगदान आहे. हिंदी ही आर्य भाष आहे. त्यामुळे तिच्या प्रचारप्रसारास आर्य समाजाच्या प्रमुख धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमात समाविष्ठ केले. महर्षि दयानंद स्वतः गुजराती भाषिक असूनही त्यांनी आपले सर्व ग्रंथ हिंदी भाषेत लिहिले. आर्य समाजाने प्रथमच इंग्रजी भाषा, इंग्रजी, संस्कृती, इंग्रजी आचार-विचार, इंग्रजी शिक्षणास विरोध करुन हिंदी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थाची स्थापना केली. वेद,वैदिक तत्वज्ञान, वैदिक संस्कृती व साहित्याच्या संरक्षण व संवर्धनात आर्य समाजाची भुमिका अवर्णनीय व प्रशंसनीय आहे. अनेक शिक्षण संस्थातून आर्य समाजाच्या वेदाच्या विचाराला सर्व सामान्य पर्यंत पोहचवण्याचे कार्य केले. महर्षि दयानंदाना एक शिक्षण शास्त्रज्ञ म्हणून संबोधले जाते. गुण-कर्म आणि न्यायावर आधारित सामाजिक संघटनेची कल्पना आर्य समाजाने केली. या सर्व संघटनात कोणीही कोणाचेही शोषण करणार नाही. आर्य समाजात समाजवाद आणि भांडवलवादा या दोघांच्या दोषांचे निवारण करण्याची क्षमता आहे. सर्वांना न्याय मिळावा यावर आर्य समाज भर देतो. मानव समाजाच्या कल्याणासाठी भौतिकता व अध्यात्मात समन्वय आवश्यक आहे. आर्य समाजाने आश्रम व्यवस्थेला उपयुक्त मानले.

आर्य समाजाची स्थापनाच मुळात धार्मिक संस्था म्हणून झाली. त्यामुळे धार्मिक क्षेत्रात या संस्थेने महत्वपुर्ण क्राती केली. वेदानुरुप मानवाच्या विचारात उदरतेचा समावेश होणार नाही. तोपर्यंत व्यक्ती व समाज सत्य आणि प्रमाच्या मुलभूत मर्यादात बांधुन राहणार नाही. वैदिक धर्माच्या खऱ्या वास्तविक स्वरुपाचा प्रचार करण्यासाठी महर्षिनी आर्य समाजाची स्थापना केली. हिंदु समाज व्यवस्थेतील पिंडदान

करणे. श्राध्द घालणे, अनेकदेवोपासना ई. विरुध्द योग्य मार्गाने आवाज उठवण्याचे काम आर्य समाज ई. विरुध्द योग्य मार्गाने आवाज उठवण्याचे काम आर्य समाजाने केले. आर्य हा शब्द श्रेष्ठ, कर्म,गुण, स्वभावधारी मानवाचा सुचक आहे. आर्य समाज म्हणजे श्रेष्ठ लोकांचा समुह होय. आर्यसमाजाने धर्माच्या क्षेत्रातील अनेक दोष व रुंढी - पंरपराचे खंडन करुन एक सर्वोच्च, सर्वशक्तीमान, निराकार परमेश्वरांच्या उपसनेच्या प्रचार केला.

अशा प्रकारे वरील सर्व विवेचनावरुन स्पष्ट होते की, राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून राष्ट्र बांधणीचे कार्य आर्य समाजाने केले. राष्ट्र बांधणीत आर्य समाजाने सक्रिय व सशक्त भूमिका निभावली. आर्यसमाजाने स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रबांधणीसह स्वातंत्र्यानंतरच्या काळात या समाजाने कांही योगदान दिले का हा महत्वाचा विषय आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळुन 70 वर्ष पूर्ण झ ााली. परंतु ज्या पध्दतीने या 70 वर्षात आमच्या लोकांनी शासन चालवले त्यावरुन हे स्वातंत्र्य कोणाच्या घरी आहे ? हा प्रश्न निर्माण होतो. या 70 वर्षात देशाच्या प्रगतीसाठी अनेक योग्य योजना बनवला. त्या योजनांची अंमलबजावणी केली. परंतु त्याचा सकारात्मक निकाल व उपयुक्तता सिध्द होत नाही. आज संपुर्ण भारतीय राजकारणाचा विचार करता सर्वत्र राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव जाणवतो. सर्वच क्षेत्रावील लोक असंतुष्ट व नाराज आहेत. दहशतवाद, भ्रष्टाचार, जातवाद, हुंडा पध्दती, सांप्रदायिक दंगली इत्यादी समस्या आजही आपल्या देशात आहेत. अशा भयानक परिस्थितीत आर्य समाजाच्या योगदानाविषयी विचार करणे योग्यच आहे. ज्या उद्देशाने व ज्या नियामाचे पालन करण्यासाठी आर्य समाजाची स्थापना झाली. त्या उद्देशाची पुर्ती झाली नाही. त्या नियमांचे पालन होत नाही तर याहीपेक्षा महत्वाचा मुद्दा म्हणजे स्वःला आर्य म्हणणारे लोकही आपल्या राष्ट्रीय कर्तव्याप्रती पुर्णतः सर्मपित नाहीत. फक्त साप्ताहिक व वार्षीक उत्सव साजरे करुन आदर्श स्थापन करण्याची चर्चा होते. परंतु अशाने आर्य समाजाचे उद्देश पुर्ण होणार नाही. या उद्देश पुर्तीसाठी आपणास आपापल्या स्तरावर या विचाराचे पालन करण्याचा संकल्प करावा लागेल. तरच आर्य समाजाचे योगदान हे होईल. राष्ट्र आमची आई असुन आपण त्याचे संरक्षण आहेत. आपण आपल्या अधिकारासोबतच कर्तव्याप्रती जागरुक असावे. सांप्रदायिक संघर्ष मिटवावा लागेल. सामाजिक दोषापासून लढावे लागेल. राष्ट्रीय भावनेचा प्रसार करावा लागेल.

यासाठी आपणास आपला दृष्टिकोण अधिक व्यापक बनवावा लागेल. संकुचित व एकांगी विचारधारनेचा त्याग करुन व्यापक व सर्वसमावेशक जीवनाचा दृष्टिकोन स्विकारावा लागेल. आर्य समाजाच्या नियमाचे पालन करावे लागेल. वेद आणि वैदिक संस्कृतीच्या पुनर्जागरणाचे प्रयत्न करावे लागेल. संस्कृत आणि हिंदी भाषेच्या प्रचारासाठी प्रयत्न करावेत. आजच्या परिस्थितीत सर्व दोषांना शोधुन दुर करावे लागेल. आज आपणास बाह्य शक्तीऐवजी अंतर्गत शक्तीपासुनच अधिक धोका आहे. या धोक्यापासुन स्वतःला वाचवण्यासाठी धाडस त्यांना व

VOL- VIII ISSUE- X OCTOBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

सहिष्णुतेच्याआधार घ्यावा लागेल. व्यक्तीपेक्षा समाज, समाजापेक्षा राष्ट्र आणि राष्ट्रापेक्षा मानवता श्रेष्ठ आहे. मानवतेचे संरक्षण हेच परमहार्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. Rajkiya Vicharacha Itihas : Dr. N.Y.Dole - Continental Publication Pune-2009
2. Bhartiya Rajnitik Vicharak - Dr.Pukhraj Jain - Sahitya Bhavan Publication Agra-2002
3. Rajkiya Sidhant - Dr.Suvarna Gudge - Benke ऱ्Prashant Publication -2014
4. Bhartiya Rajniti Vidyan Patrika - July- Dec. -2014 - Sampadak - Chandraprakash Barthval -

Dr. Mohan N. Khatal
Principal
A. V. Education Society's
Degloor College Degloor Dist.Nanded